# १. इतिहास म्हणजे काय ?

इतिहास : भूतकाळातील घटनेचे ज्ञान करून देणारे शास्त्र.

मागील इयत्तेत आपण शिवाजी महाराजांचे चरित्र, त्यांच्या कार्यांचा अभ्यास केला. हा शिवाजी महाराजांचा काळ म्हणजे चारशे वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. त्यामुळे याला जुना काळ किंवा होऊन गेलेला काळ असे आपण बोलतो.

आपण आपल्या रोजच्या जीवनात अनेक गोष्टींचा उल्लेख करतो. त्यात आपण तीन पद्धतींचा काळ दर्शवतो. पहिला म्हणजे निघून गेलेला काळ. त्यालाच भूतकाळ असे म्हणतात. यात आपण गोष्टींचा संबोध थोड्या वेळापूर्वी, काल, मागच्या वर्षी इत्यादी शब्दांचा वापर करून त्याचा उल्लेख करतो. दुसरा काळ म्हणजे वर्तमानकाळ. वर्तमानकाळ म्हणजे चालू क्षण. यात आपण आज, आता, यावर्षी अशा पद्धतीने गोष्टींचा संबोध करतो. आता तिसरा आणि शेवटचा काळ म्हणजे भविष्यकाळ. यात आपण होणाऱ्या गोष्टींचे आधीच भाकीत करतो. जसे की, पुढच्या वर्षी, उद्या, थोड्या वेळानंतर या सर्व गोष्टी भविष्यकाळ संबोधतात.

जर आपल्या जीवनावरच आधारित एक उदाहरण बघायचे तर मी ५ वर्षांपूर्वी ७ वी मध्ये होते. यात आपण भूतकाळ दर्शवितो आणि मी ४ वर्षांनंतर पदवी घेऊन पास होणार यात आपण भविष्यकाळ दर्शवितो.



भूतकाळ
जन्मदिवस
दहा वर्षांपूर्वी

वर्तमानकाळ
आम्ही दहा वर्षाचे आहोत.
आज

भविष्यकाळ
आम्ही वीस वर्षाचे होऊ.
दहा वर्षांनी

भूतकाळात आपण आपल्या जगलेल्या जीवनावर बोलतो. अशाप्रकारे भूतकाळातील घटना समजून घेण्याच्या शास्त्राला इतिहास म्हणतात.

इतिहासाची शास्त्रीय पद्धत :

आपण याआधी तिसरी आणि चौथीत इतिहासाच्या अभ्यासात विविध शास्त्रांची ओळख करून घेतली आहे. आपल्याला हेपण माहित आहे की, कोणताही पुरावा पाहताचक्षणी योग्य समजला जात नाही. त्याच्यावर विविध कसोट्या करून त्याचा खरेपणा बघितला जातो. या अशा पद्धतीचा वापर करून त्याची केलेली पाहणी म्हणजेच शास्त्रीय पद्धत होय.

आपल्या जीवनाबद्दल बोलायचे झाले तर आपल्या लहानपणी घडलेली घटना घरातील प्रत्येक व्यक्ती ही थोड्याफार बदलाने आपल्याला सांगत असते. परंतु प्रत्यक्षात आपल्याला ती आठवत नसल्यामुळे कोणाचे खरे समजावे हे कळत नाही. अशावेळी आपण बारकाईने तपासले तर आपल्याला हे कळू शकते. आपण अशा घटना परत घडवून त्यातला खरेपणा पाहू शकत नाही. अशावेळी आपल्याला शास्त्रीय पद्धतीची मदत घेऊन या गोष्टींचा तपास करावा लागतो. त्यामुळे या शास्त्रीय पद्धतीचा वापर करून मांडलेल्या गोष्टींना इतिहास असे म्हणतात. या सर्वांमुळे इतिहास फक्त भाकीत कथांवर आधारित आहे असे आपण बोलू शकत नाही.

आता आपण पाहूया ही शास्त्रीय पद्धत कशावर अवलंबून आहे ?

इतिहासाची साधने म्हणजे प्राचीन वस्तू, वास्तू, शिल्पे, नाणी, भांडी, कोरीव लेख, ताम्रपट, ग्रंथ, हस्तलिखिते, लोकांच्या स्मरणातील कथा, कहाणी इत्यादी होय. या सर्वांचा वापर इतिहास

मांडण्यासाठी केला जातो. आपल्या इतिहासात भौतिक, लिखित आणि मौखिक अशी तीन साधने आहेत. या साधनांवर मोठ्या अवधीत काम करून खरेपणा वाटणाऱ्या गोष्टींना हाताशी धरून घटनाक्रमानुसार इतिहासाची मांडणी केली जाते. या सर्व पद्धतीलाच शास्त्रीय पद्धत बोलतात.

इतिहास आणि आपण :

प्रत्येक शास्त्र हे त्या-त्या विषयाचा आढावा देत असते. उदा. अर्थशास्त्र हे आपल्याला आधीच्या काळातील आपल्या देशाचा विकास आणि आताचा आपला विकास याबद्दल सांगते. तसेच कोणत्या गोष्टींमुळे आपल्या देशाचा विकास कमी होतो किंवा वाढतो या गोष्टीही दाखवून देते. तसाच इतिहास हा भूतकाळातील गोष्टींची माहिती देतो.

आपल्या समाजाची प्रगती ही माणसाच्या वागणुकीवर आधारित असते. उदा. जर आपला परिसर स्वच्छ ठेवायचा असेल तर आपल्या सर्वांना ते लक्षात ठेवूनच काम केले पाहिजे. कचरा कचरापेटीत टाकून आणि त्याची योग्य विल्हेवाट लावली पाहिजे. तेच जर काही लोकांनी नाही केले तर या स्वच्छतेच्या मोहिमेला यशस्वी रूप येणार नाही. यावरून हेच कळते की कोणतेही काम एकजुटीने केले पाहिजे. इतिहास ही माणसाच्या भूतकाळातील कृतींचा, विचारांचा आणि त्यांच्या परिणामांचा विचार करून आपल्याला वर्तमानकाळातील कोणत्या गोष्टी करणे योग्य आणि कोणत्या अयोग्य आहे हे ठरवता येते आणि त्यातून आपण आपला चांगला भविष्यकाळ घडवू शकतो.

भूतकाळातील अनेक चरित्रात लिहिलेल्या घटनांचा उल्लेख मानवी समाजातील होणारे बदल तसेच अनेक संस्कृतींच्या आणि चालीरितींच्या होत आलेल्या वाटचाली समजण्यास मदत करते. इतिहास हा प्रत्येक गोष्टींचा असतो. जसे की एखाद्या गावाचा, शहराचा, राज्याचा, देशाचा इतिहास तसेच डोंगर, नद्या, पर्वत, जलाशय, वास्तू यांनाही त्यांचा इतिहास आहे.

शास्त्रांचा इतिहास हा आपल्या मानवी संस्कृतीतील बदल घडवून आणलेल्या शोधांचा आणि ते घडवून आणलेल्या शास्त्रज्ञांची माहिती देतो.

भूतकाळ आणि भविष्यकाळ : भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ हा आपणास अनेक गोष्टींचा झालेला परिणाम, चालू कृती आणि होणारा परिणाम दाखवून देतो. जसे की, आपल्या भारतावर इंग्रजांचे राज्य होते आणि त्यासाठी आपण स्वातंत्र्यलढा देऊन १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला देश स्वतंत्र केला. यात या सर्व गोष्टी भूतकाळातील आहेत. पण या भूतकाळातील गोष्टींचा परिणाम म्हणजेच वर्तमानकाळातील आपले स्वातंत्र्य आहे.



भूतकाळातील शोध आणि तंत्रज्ञान

ही एक गोष्ट आहे. पण अशा अनेक गोष्टी आपल्या भूतकाळातील गोष्टींचे परिणाम किंवा घडवून आणलेले बदल दाखवून देतात. अजून सांगायचे झाले तर भूतकाळातील माणसाने लावलेले जीवनाचे, अग्नीचे शोध, बनवलेली हत्यारे, त्याने तयार केलेल्या वस्तू अशा अनेक गोष्टींमुळे आपल्या भविष्यकाळात त्यांना अजून सुधारून आपले जीवन सोपे आणि सोयीस्कर बनवता आले आहे.





वर्तमानकाळातील शोध आणि तंत्रज्ञान

अशाप्रकारे येणारी प्रत्येक पिढी भूतकाळातील शोधांचा आधार घेऊन नवनवीन शोध लावत आहे आणि आपले तंत्रज्ञान अजून विकसित करत आहे. पुढेही हे विकसित शोध भूतकाळावरच अवलंबून राहणार आहेत.

तुम्हाला माहीत आहे का ?

विविध प्रकारच्या वस्तू आणि वास्तू ज्या माणसाने भूतकाळात निर्माण केल्या. त्या आपल्याला जमिनीवरच दिसतात असे नाही. अनेक वस्तू आणि वास्तू निसर्गाच्या प्रलयामुळे तसेच नद्यांच्या पुरात वाहून जाऊन जमिनीखाली गाडल्या गेल्या आहेत. अशा अवशेषांना पुरावशेष म्हणतात. 'पुरा' म्हणजे जुने.

भूतकाळातील वस्तू आणि वास्तू यांच्या तसेच त्यांच्या अवशेषांच्या आधारे घडून गेलेल्या घटनांची मांडणी शास्त्रीय पद्धतीने करणाऱ्या शास्त्रास 'पुरातत्त्व शास्त्र' असे म्हणतात आणि या सर्वांचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांना पुरातत्वज्ञ असे म्हणतात. जमिनीखाली गाडले गेलेले पुरावशेष उजेडात आणण्यासाठी जमिनीचा एकेक थर अत्यंत शास्त्रशुद्ध रीतीने तपासत, काळजीपूर्वक रीतीने खणण्याला 'पुरातत्त्वीय उत्खनन' असे म्हणतात. पुरातत्त्व कुठे सापडले जाऊ शकतात याचा शोध घेऊन ते सापडल्यावर त्यांच्यावर कसा आणि किती अभ्यास करायचा याचे नियोजन केले जाते.

उत्खननात सापडलेल्या अवशेषांचा अभ्यास करत असताना पुरातत्वज्ञ अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतात.